जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे
दैनिक | वर्ष १ | अंक ९३ | रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




## संक्षिप्त

### शेतकऱ्यांना ३२५८ कोटी रुपयांची मदत मंजूर

**मुंबई, ता. १८ :** सरकारने २३ जिल्ह्यांमधील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ३२५८ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे, असे राज्यमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले. गेल्या दोन दिवसांत, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी अनेक ठरावांद्वारे ५,३६४ कोटी रुपयांची मदत मंजूर केली आहे. सरकारने आता पाऊस आणि पूरग्रस्त जिल्ह्यांमधील ३३.६५ लाख शेतकऱ्यांसाठी ३ हजार २५८ कोटी रुपये मंजूर केले आहेत. राज्य सरकारने या आठवड्याच्या सुरुवातीला २१.६६ लाख बाधित शेतकऱ्यांसाठी १३५६.३० कोटी रुपयांची मदत मंजूर केली होती. या महिन्याच्या सुरुवातीला, सरकारने शेतकऱ्यांसाठी ३१, ६२८ कोटी रुपयांचे भरपाई पॅकेज जाहीर केले होते, ज्यामध्ये एकूण मदत ४८ हजार रुपये प्रति हेक्टर असेल असे म्हटले होते. तथापि, विरोधी पक्षांनी शेतकऱ्यांचे जीवन पुन्हा उभे करण्यासाठी मदत पॅकेज खूपच तुटपुंजे असल्याचे म्हटले आहे. सप्टेंबरमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पुरामुळे मराठवाडा आणि लगतच्या प्रदेशांना मोठा फटका बसला. ६८.६९ लाख हेक्टरवरील पिके नष्ट झाली.

# टाळगाव चिखलीतील ५ एकर जागेत होणार अपर तहसीलदार कार्यालय

## महसूल नोंदणी विभागाची प्रस्तावाला मंजुरी

**पिंपरी-चिंचवड, ता. १८ :** पिंपरी-चिंचवड अपर तहसील कार्यालयासाठी आता हक्काच्या जागेचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला आहे. टाळगाव चिखली येथील ५ एकर जागा तहसील कार्यालयास उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला राज्याच्या महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने मान्यता दिली. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याकामी सकारात्मक निर्णय घेतला. पिंपरी-चिंचवडकरांसाठी हक्काच्या जागेत तहसील कार्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



पिंपरी-चिंचवड शहराच्या अपर तहसीलदार कार्यालयासाठी जागेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. त्यामुळे दोन-तीन ठिकाणी कार्यालय स्थलांतरीत करावे लागले. तहसीलदार कार्यालयासाठी हक्काची जागा मिळावी. त्याठिकाणी सुसज्ज तहसीलदार कार्यालय, निवासस्थान, नागरी सुविधा केंद्रसुद्धा उभारण्यात यावे. या करिता भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्याला अखेर यश मिळाले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीतही पिंपरी-चिंचवड शहराच्या तहसीलदार कार्यालयासाठी प्रस्तावित जागेचा प्रश्न मार्गी लावावा. याबाबत लक्ष वेधण्यात आले होते. याबाबत पुणे जिल्हाधिकारी प्रशासनाकडे जागेची मागणी करण्यात आली. महसूल आणि जिल्हा प्रशासनाच्या सकारात्मक अभिप्रायानंतर चिखली येथील स. नं. ५३९ येथील ५ जागा अपर तहसीलदार कार्यालय पिंपरी-चिंचवडसाठी मिळावी, असा प्रस्ताव पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाने राज्याच्या महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे पाठवला होता. त्याला मान्यता मिळाली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र ३१ डिसेंबर २०१५ नुसार ज्या ठिकाणी राज्य शासनाचे रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पाकरीता शासकीय जमीन आवश्यक असेल तेथे अशा जमीनीचे भोगवटा मूल्य कितीही असले, तरी जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधित विभागास महसुल मुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील, असे नमुद केलेले आहे. या नियमाला अनुसरून जागा उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> पिंपरी-चिंचवडकरांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला आता पूर्णविराम मिळाला आहे. टाळगाव चिखली येथे तहसील कार्यालयासाठी हक्काची एकर जागा उपलब्ध झाल्यामुळे आता नागरिकांना सुसज्ज व कार्यक्षम सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हे यश सर्वसामान्य जनतेच्या पाठिंब्यामुळे आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे मिळाले आहे. लवकरच या ठिकाणी आधुनिक व सुसज्ज तहसील कार्यालय उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा उभ्या करण्यात येतील. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी मी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे पिंपरी-चिंचवडच्या लाखो नागरिकांना प्रभावी प्रशासकीय सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पिंपरी-चिंचवड शहराची वाटचाल शाश्वत विकासाच्या दिशेने सुरू आहे, याचे समाधान वाटते.
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोसाठी येरवड्यातील जागा हस्तांतरित

**पुणे, ता. १८ :** हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) येरवडा येथील ४८ हजार ५०० चौरस मीटर शासकीय जागा कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यात येणार आहे. तसा निर्णय राज्य शासनाने घेतला असून या जागेचा वापर मेट्रो प्रकल्पासाठी लागणाऱ्या व्यवहार्यता तफावत निधी (व्हीजीएफ) उभारण्यासाठी केला जाणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून हा निर्णय घेण्यात आला आहे.

येरवडा येथील विविध सिटी सर्व्हे क्रमांकांमधील एकूण ४८ हजार ६०० चौरस मीटर जमीन पीएमआरडीएला देण्यात आली आहे. यामध्ये सिटी सर्व्हे क्रमांक २२०१ मधील १४ हजार ८८० चौरस मीटर, सिटी सर्व्हे क्रमांक २२१६ मधील १५ हजार ६६०.१ चौरस मीटर आणि सिटी सर्व्हे क्रमांक २२२० मधील १५ हजार ९५४ चौरस मीटर क्षेत्राचा समावेश आहे. ही जमीन भांबुर्डा येथील १० हेक्टर ६० आर जागेच्या बदल्यात पर्यायी जागा म्हणून हस्तांतरित करण्यात आली आहे.

या हस्तांतरणासाठी शासनाने काही अटी घातल्या आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ आणि नियम १९७१ नुसार ही जमीन विनामूल्य आणि कायमस्वरूपी कब्जे हक्काने पीएमआरडीएला देण्यात आली आहे. पीएमआरडीएला ही जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करावी लागणार आहे. या जमिनीचा व्यावसायिक विकासातून मिळणारा नफा राज्य शासनाच्या व्यवहार्यता तफावत निधीसाठी वापरला जाणार आहे. यासाठी सिटी सर्व्हे क्रमांक २२२० वरील शिक्षण संकुलाचे आरक्षण नगर विकास विभागाकडून बदलण्यात येणार आहे.

दरम्यान, जमिनीचा वापर केवळ मेट्रो प्रकल्पासाठीच करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या अटींचा भंग झाल्यास जमीन शासनाकडे परत जमा केली जाईल. तसेच, जमीन हस्तांतरणापूर्वी पीएमआरडीएकडून लेखी हमीपत्र घेणे आवश्यक असल्याचे निर्देश राज्य शासनाकडून पुणे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गाच्या प्रगतीला गती मिळणार असून पुणे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ आणि कार्यक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# घोडनदी पात्रात पिकअप उलटली; सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

**अक्षय टेमगिरे**

शिरूर, ता. १८ : शिरूर तालुक्यातील चिंचणीबोरी परिसरात शनिवारी सकाळी घोडनदीच्या पात्रात एक थरारक घटना घडली. प्रवाशांनी भरलेले पिकअप वाहन नदीपात्रातून अरुंद रस्त्याने जात असताना घसरून थेट नदीच्या पात्रात उलटले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, या पिकअपमध्ये एकूण १५ प्रवासी प्रवास करत होते त्यापैकी ९ पुरुष आणि ६ महिला होत्या. नदीपात्रातून अरुंद रस्ता आणि चालकाला वळणाचा अंदाज न आल्याने वाहन नदीत घसरल्याची माहिती मिळाली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले. त्यांच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना



टळली असली तरी काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, चिंचणीबोरी येथील ग्रामस्थांनी घोडनदीवरील पूल बांधण्यासाठी अनेक वेळा मागणी केली आहे. काही दिवसांपूर्वीच ग्रामस्थांनी तत्कालीन व माझी खासदार आणि आमदार यांना निवेदन देऊन या पुलाचे काम तातडीने हाती घेण्याची विनंती केली होती. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, थोड्याशा पावसातसुद्धा हा रस्ता पाण्याखाली जातो, त्यामुळे दोन्ही गावांचा संपर्क तुटतो. शेतकरी आणि कामावर जाणारे नागरिक यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी प्रशासनाकडे संताप व्यक्त करत म्हटले आहे की, अनेक वेळा निवेदन दिल्यानंतरही प्रशासनाकडून ठोस कारवाई झालेली नाही. शासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन पूल बांधण्याचे काम लवकरात लवकर सुरू करावे. स्थानिक नागरिकांनी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांकडे तातडीने पूल बांधकामास सुरुवात करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटना टळतील आणि नागरिकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध होईल.

## दिवाळी सणानिमित्त खरेदीसाठी शिरुर बाजारात नागरिकांची झुंबड

**रांजणगाव गणपती, ता. १८ :** शिरुर येथील आठवडे बाजारात शनिवारी (ता. १८) पणत्या, रांगोळी, केरसुणी (लक्ष्मी), पूजन साहित्य व लक्ष्मी पावले यांची खरेदी करण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली होती. दिवाळी सणाच्या स्वागताची लगबग बाजारात जागोजागी दिसून येत आहे. दिवाळी सणाची सुरुवात वसूबारसपासून होत असली तरी दिवाळी सणाचा मुख्य पर्व लक्ष्मीपूजन असतो. दिवाळी सणानिमित्त लक्ष्मीचे स्वागत धार्मिक व सांस्कृतिक वातावरणात होण्याची सर्वांची इच्छा असते. तंत्रज्ञानाच्या युगात सफाईची विविध साधने बाजारात उपलब्ध आहेत, परंतू दिवाळी सणाला केरसुणीला मोठया प्रमाणात मागणी आहे. लक्ष्मी पूजनच्या दिवशी प्रथेप्रमाणे पूजा करण्यासाठी केरसुणीचे महत्व अनन्य साधारण आहे. केरसुणी व्यावसायिक गावोगावी फिरुन व्यवसाय करत असल्याचे दिसून येत आहे.




कृपया संपर्क साधा-
हवेंली शाखा - 9307446077 | खेड शाखा - 9604214379
पुरंदर शाखा - 8888815548 | भोर शाखा - 8482888575
डीलर - 9307446077/9112218282
* नियम व अटी लागू
* स्कीम स्टॉक उपलब्ध होईपर्यंत आणि मर्यादित कालावधीसाठी वैध आहे
* स्कूटर विमा, आरटीओ आणि ॲक्सेसरीजचे शुल्क फक्त ग्राहकांनी भरावे
* स्कूटरची सर्विस आणि स्पेयर पार्ट्स अधिकृत कंपनीकडेच सशुल्क आधारावर उपलब्ध असतील
SONALIKA HEAVY-DUTY ASSURANCE FIVE 5 YEARS WARRANTY

# एमआयटी-एडीटी विद्यापीठ व सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात सामंजस्य करार

**पुणे, ता. १८ :** एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे आणि कॉलेज ऑफ इंजिनियरिंग (सीओईपी) तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे यांच्यात शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे.

या करारामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रकल्प, इंटर्नशिप तसेच भविष्यातील नवीन प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळणार आहे. या करारामुळे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच दोन्ही संस्थांमधील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होणार आहेत.

एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे प्र-कुलपती तथा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनिता कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सीओईपी



तंत्रज्ञान विद्यापीठात या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या प्रसंगी एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रा. डॉ. विरेंद्र शेटे (संचालक एनईपी, रँकिंग व मान्यता), कुलसचिव डॉ. महेश चोपडे, आणि परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. ज्ञानदेव निलवर्ण उपस्थित होते.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाकडून कुलगुरू प्रा. डॉ. एस. बी. भिरूड, कुलसचिव डॉ. डी. एन. सोनवणे आणि प्रा. डॉ. विभा व्यास (विभागप्रमुख इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन विभाग) यांच्या उपस्थितीत हा करार पार पडला.

या कराराचा उद्देश शैक्षणिक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच ज्ञानविनिमयाच्या माध्यमातून दोन्ही प्रतिष्ठित संस्थांमधील सहकार्य वृद्धिंगत करणे हा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विविध शाखांतील विद्यार्थ्यांची देवाणघेवाण, संसाधन वाटप आणि दोन्ही संस्थांच्या समन्वयातून संशोधनास चालना मिळून विद्यार्थी व संशोधकांना आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांमध्ये अधिक संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

पुणे प्राईम न्यूज — जनमानसाचा निडर आवाज...



## नीलेश घायवळ टोळीने महिला उद्योजिकेकडून ४४ लाख उकळले; जीवे मारण्याची दिली धमकी

**पुणे, ता. १८ :** कर्वेनगर आणि शिवणे भागातील एका नामवंत शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नपदार्थ तसेच वाहतूक सेवा पुरविणाऱ्या एका खासगी कँपनीतील संचालक महिलेला धमकावून नीलेश घायवळ, त्याचा भाऊ सचिन आणि त्यांच्या साथीदारांनी तब्बल ४४ लाखांची खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नीलेश घायवळसह एकूण १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात शाळेतील एका क्रीडा शिक्षकाविरुद्धही गुन्हा नोंदवण्यात आला असून, कोथरूड गोळीबार प्रकरणात पसार असलेल्या नीलेश घायवळविरुद्ध आतापर्यंत सात गुन्हे दाखल झाले आहेत.



या प्रकरणात तक्रारदार म्हणून ४० वर्षीय महिला वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात आलेल्या आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांनी कोथरूड भागात भागीदारीत एक कँपनी सुरू केली असून त्याचे कार्यालय प्रभात रस्ता परिसरात आहे. या कँपनीकडून कर्वेनगर आणि शिवणे भागातील नामवंत शाळेत विद्यार्थ्यांना अन्नपदार्थ आणि वाहतूक सुविधा पुरविली जातात. शाळांना नियमित भेट दिल्यामुळे महिलेची शाळेतील कर्मचाऱ्यांशी ओळख झाली होती.

कर्वेनगर भागातील एका शाळेत क्रीडा शिक्षक म्हणून काम करणारा बापू कदम या आरोपीशी महिलेची २०२४ मध्ये भेट झाली. कदमने महिलेच्या कँपनीकडून पनीर, दूध खरेदी करण्याची मागणी केली, तसेच स्वतःच्या डेअरीतून शाळेतील उपाहारगृहाला पुरवठा करण्याचे काम त्याला द्यावे, असे सांगितले. महिलेला पुढे कळाले की कदमचा संबंध गुन्हेगारी टोळीशी आहे. त्यानंतर महिला वेळोवेळी कदमच्या खात्यात २२ लाख २ हजार रुपये जमा करीत होती, मात्र पनीर व दूध पुरवठा झाला नाही.

जानेवारी २०२५ मध्ये कदमने महिलेला धमकावले की, नीलेश घायवळ टोळीसाठी काम करत असून त्याचा भाऊ सचिन हा क्रीडा शिक्षक आहे; शाळेतील उपाहारगृहासाठी आमच्याकडून दूध-पनीर खरेदी करावे नाहीतर व्यवसाय बंद करणार, अशी धमकी दिली. महिला मोटारीतून शाळेच्या परिसरातून निघत असताना कदमने मोटार अडविली आणि दुसऱ्या मोटारीतून नीलेश, सचिन आणि साथीदार उतरे. सचिनने तुम्हाला जिवंत राहायचे नाही का? अशी धमकी देऊन लवकर पैसे जमा करण्यास सांगितले. महिला घाबरून पुन्हा २२ लाख रुपये बँक खात्यात जमा करीत होती.

या सर्व घटनेनंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वारजे पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## नंदुरबारमध्ये अपघात, ७ भाविकांचा मृत्यू

**नंदूरबार, ता. १८ :** ऐन दिवाळीत चांदशैली घाटात शनिवारी एक भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये सात भाविकांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी आहेत. यापैकी काही जणांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. प्राथमिक माहितीनुसार, येथील चांदशैली घाटात पिकअप उलटून हा अपघात झाला. या वाहनातील लोक अस्तंबा यात्रेसाठी गेले होते. ही यात्रा संपवून माघारी परतत असताना काळाने या भाविकांवर घाला घातला.

या अपघातामध्ये सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच अनेक जण जखमी झाले आहेत. यापैकी १० जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. सध्या या सर्वांना तळोदा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले जात आहे. या अपघातानंतर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

### संक्षिप्त

## शिक्षक शिक्षकेत्तर सेनेच्या राज्य उपाध्यक्ष पदी संभाजी शिरसाट यांची निवड



**सोमाटणे, ता. १८ :** शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्या महाराष्ट्र राज्य शिक्षक शिक्षकेतर सेनेच्या राज्य उपाध्यक्ष पदी भोसरी विधानसभेचे शहर प्रम ुख संभाजी शिरसाट यांची निवड करण्यातत आली आहे. त्यांना संबंधित निवडीचे पत्र हे सचिव संजय मोरे , किरण पावसकर , महिला अध्यक्ष मीनाताई कांबळी व शिक्षक सेनेचे राज्याध्यक्ष आमदार किशोर दराडे यांच्या हस्ते देण्यात आले . संभाजी शिरसाट हे गेले १७ वर्षे पश्चिम महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील एक अभ्यासु चेहरा आणि शिक्षक चळवळीत अग्रेसर असणार व्यक्तिमत्त्व म्हणुन त्यांच्याकडे पाहिले जाते. यामुळेच या पदावर त्यांची वर्णी लागली आहे. स्वत: शिक्षक असल्याने त्यांना या क्षेत्राची चांगली जाण आणि शिक्षकांच्या प्रश्नांची समज आहे. येत्या काही महिन्यात येऊ घातलेल्या शिक्षक व पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत पक्षाला याचा फायदा होऊ शकतो. संभाजी शिरसाट म्हणाले, पक्षाने दिलेली जबाबदारी मी वेळोवेळी प्रामाणिक आणि मनापासून पार पाडण्याचा प्रयत्न केला आहे आणि यापुढेही पक्षाचे हित हे माझे आद्य कर्तव्य असेल. माझ्या या निवडीमुळे शिक्षण क्षेत्रात असणाऱ्या अडचणी आणि शिक्षक शिक्षकेत्तर बांधवांचे प्रश्न मी मंत्री महोदय व पक्ष प्रमुख शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहे. या निवडीमुळे संभाजी शिरसाट यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## अखिल भारतीय ग्राहक पंचायत हवेली तालुकाध्यक्षपदी संदिप शिवरकर



**पुणे, ता. १८ :** ग्राहक हक्कांच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या अखिल भारतीय ग्राहक पंचायत संघटनेच्या हवेली तालुकाध्यक्षपदी संदिप शिवरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्री क्षेत्र ओझर येथे होणाऱ्या मध्य महाराष्ट्र प्रांताचा दोन दिवसीय निवासी अभ्यास बैठकीचे आयोजन २५ व २६ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे. या निमित्ताने या बैठकीचे आयोजन नारायणगाव (ता. जुन्नर) येथील विश्रामग्रहात पार पडली. महाराष्ट्र प्रांत सदस्य भानुदास सरडे, पुणे जिल्हा कोषाध्यक्ष राघवदास चौधरी यांच्या वतीने जिल्ह्याचे सचिव अशोक भोर यांच्या उपस्थितीत शिवरकर यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी ग्राहक पंचायतचे प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी, प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे, प्रांत सदस्य भानुदास सरडे, नयना आभाळे, आयाम प्रमुख, तुषार झेंडे, देवेंद्र जगताप, अशोक भोर, राघवदास चौधरी, ज्ञानेश्वर उंडे, दिलावर तांबोळी, देवानंद बवले, देविदास काळे आदी मान्यवर उपस्थित होते. संदिप शिवरकर हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून, त्यांनी ग्राहकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. तसेच ते सध्या महाराष्ट्र शासनाच्या जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर सदस्य म्हणून काम करत आहेत. त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत अखिल भारतीय ग्राहक पंचायतने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवलेली आहे. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना शिवरकर म्हणाले, ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची असून, ग्राहकांच्या हितासाठी मी सदैव तत्पर राहीन. ग्राहकांच्या अडचणी सोडवण्यासाठी तसेच जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जातील. ग्राहकांचे हक्क आणि सुरक्षा सुनिश्चित करणं हे आपलं प्राथमिक उद्दिष्ट असणार आहे.

## शहरातील श्वानांना मायक्रोचिप बसविण्यात येणार; पुणे महानगरपालिकेचा निर्णय

**पुणे, ता. १८ :** देशभरात भटक्या श्वानांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.या भटक्या श्वानांनी नागरिकांना चावल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. एखाद्या व्यक्तीला श्वान चावल्यास त्या रुग्णाने डॉक्टरांकडे जाऊन वेळेत उपचार न घेतल्यास, त्या रुग्णाचा रेबीज या आजाराने मृत्यू झाल्याच्या घटना अनेक समोर आल्या आहेत.

या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार मार्फत रेबीज मुक्त उपक्रम हाती घेतला आहे. त्या अनुषंगाने दिल्ली, गोवा, जयपूर, बंगळूरु या ठिकाणी भटक्या श्वानांना मायक्रोचिप बसविण्यात येत आहे, जेणेकरून त्या श्वानांचे लसीकरण करण्यात आले का, तो श्वान कुठे आहे, याबाबत म ायक्रोचिपद्वारे माहिती मिळण्यास मदत





होत आहे. आता महाराष्ट्रातील पुणे महापालिकाप्रशासनानेभटक्याश्वानांना मायक्रोचिप बसविण्याचा निर्णय घेतला आहे. तर अशा प्रकारचा निर्णय घेणारी पुणे महापालिका राज्यातील पहिली ठरली आहे.

याबाबत पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, पुणे शहर आणि आसपासच्या भागात मागील काही दिवसामध्ये भटक्या कुत्र्यांनी नागरिकांना चावल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता येत्या काळात पुणे शहरातील भटक्या श्वानांचे लसीकरण मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. तर आता भटक्या कुत्र्यांना मायक्रोचिप बसवण्याचा निर्णय पुणे महानगरपालिकेने घेतला असून आमच्याकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून शहरात जवळपास ३ लाखांच्या आसपास भटकेकुत्रे आहेत. पण आम्ही सध्याच्या घडीला प्रायोगिक तत्त्वावर ६०० कुत्र्यांना मायक्रोचिप बसवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, नसबंदी शस्त्रक्रिया करताना श्वानांना आधार कार्ड प्रमाणे नंबर मिळणार आहे.स्कॅनरच्या मदतीने श्वानांचा खांद्यावरील चीप स्कॅन करून त्या क्रमांकाच्या आधारे भटक्या कुत्र्यांची सर्व माहिती उपलब्ध होणार आहे.मायक्रोचीप असलेल्या श्वानांचे चीप स्कॅन केल्यानंतर शस्त्रक्रिया आणि लसीकरण याची सर्व माहिती तातडीने प्राप्त होऊन सदर श्वानास लसीकरण करणे याबाबत नियोजन करता येईल. पुणे महानगरपालिकेकडून सुरु असलेले भटक्या कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया आणि ॲन्टीरेबीज लसीकरण करण्याचे उद्दिष्ठ यामुळे पूर्ण करता येऊ शकेल,असे त्यांनी यावेळी सांगितले.

## बनावट हारपिक, लिझोल, कोलिनची मोठ्या प्रमाणावर विक्री

**पिंपरी, ता. १८ :** हारपिक, लिझोल कोलिन यांची बनावट उत्पादने विकणाऱ्या २ दुकानांवर चिंचवड पोलिसांनी छापे टाकून बनावट माल जप्त केला. दोघा दुकानदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सर्फराज तांबोळी (वय ४३, रा. कसबा पेठ) यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी खैराज नारायणराव देवासी (वय ५०, रा. वाहिला वस्ती, पाटीलनगर, डुडुळगाव) आणि जगदीश कुआराम देवासी (वय २८, रा. शिवाजीनगर, डुडुळगाव) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सर्फराज तांबोळी हे स्पिड ॲन्ड सर्च नेटवर्क कंपनीचे प्रतिनिधी आहेत. त्यांना माहिती मिळाली की, हारपिक, लिझोल, कोलिन यांची बनावट



उत्पादने विकली जात आहे. त्यानुसार दिघी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी पोलीस उपनिरीक्षक आबा काटपले व त्यांच्या सहकाऱ्यांना आदेश दिला.

दरम्यान, पोलिसांनी डुडुळगाव येथील श्री राम बालाजी ट्रेडर्सवर छापा टाकला. खैराज देवासी याच्या दुकानातून हारपिक, लिझोल, कोलीन सारखे मिळतेजुळते असलेली २० हजार ३९७ रुपयांची उत्पादने जप्त केली. जगदीश देवासी याच्या बालाजी ट्रेडर्स या दुकानातून १४२० रुपयांची उत्पादने जप्त करण्यात आली असून दोघांवर कॉपीराईट कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अष्टापुरात किरकोळ कारणावरून तरुणाला बेदम मारहाण

### ७ ते ८ जणांवर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा

**उरुळी कांचन, ता. १८ :** पाण्याच्या टाकीजवळ थुंकू नका म्हटल्याच्या किरकोळ कारणावरून ७ ते ८ जणांनी एकाला लाथा बुक्यांनी व लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना अष्टापूर फाटा (ता. हवेली) परिसरात घडली आहे. रविवारी (ता. १२) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली आहे.

दिपक संभाजी गवारे (वय ३५, रा. कल्लकवाड, पिंपरी सांडस ता, हवेली) नरेश आनंद पाईकराव (वय -२५, रा. स्वामी समर्थ पार्क अष्टापुर फाटा, पिपरी सांडस ता. हवेली), व इतर ७ ते ८ अनोळखी इसमांवर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी स्वप्निल कुंडलिक कोतवाल (वय ३४, धंदा





शेती, रा. शिवनगर, आष्टापूर फाटा, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींवर विविध नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्निल कोतवाल हे पिण्याच्या पाण्याचा जार भरण्यासाठी स्वामी समर्थ पार्क अष्टापुर फाटा येथे गेले होते. यावेळी जार नळाखाली भरत असताना नरेश पाईकराव हा जारच्या जवळ थुंकला, यावेळी कोतवाल यांनी त्यास पाणी पिण्यासाठी घेवुन जात आहे तु तिकडे लांब थुक असे म्हणाले, तेव्हा परत त्याने जाणीव पुर्वक जारजवळ येऊन थुंकले. यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला.

सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास दिपक गवारे याने फिर्यादीच्या मोबाईलवर फोन केला. शिवीगाळ करून बघुन घेण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीला फाट्यावर बोलवुन घेतले त्यावेळी दिपक गवारे यान नरेश पाईकराव याच्यासोबत झालेल्या वादावरुन शिवीगाळ केली. तसेच तेथे हजर असलेले योगेश कोतवाल यांनी वाद मिटवला. काही वेळाने पुन्हा दिपक गवारे याने फिर्यादीला फोन करुन शिवीगाळ केली. यावेळी वाद वाढू नये म्हणून फिर्यादी घराकडे निघाले होते. यावेळी योगेश कोतवाल दिसल्याने त्यांना भेटुन दिपक गवारे शिवीगाळ करत असल्याचे सांगितले.

यावेळी सदर ठिकाणी तीन चारचाकी गाड्या, अशा तीन गाड्या थांबल्या व त्या गाड्यामधुन ७ ते ८ जण खाली उतरले व त्यांनी काहीएक न विचारता लाथा बुक्यांनी व लाकडी दांडक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

दरम्यान, स्वतःला वाचविण्यासाठी फिर्यादी पळत होते. यावेळी दिपक गवारे हा गाडीतील घोडा काढा याला बघुन घेवु अशी धमकी देत होता. जिव वाचवण्यासाठी त्या ठिकाणी असलेल्या एका दुकानात लपून बसल्याचे फिर्यादीने सांगितले. सदरची माहिती भावाला दिली असता त्याने फिर्यादीला केसनंद येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. पुढील तपास लोणीकंद पोलीस करीत आहेत.

## भिगवण पोलिसांची दिवाळीपूर्वी धडाकेबाज कारवाई

### अट्टल चोरट्याला अटक, एक लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १८ : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर भिगवण पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालीत असताना दुचाकी व रिक्षा चोरी करणाऱ्या एका अट्टल चोरट्याला भिगवण पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गणेश गंगाधर टिंगरे (वय , रा. लोहार गल्ली, ता. कर्जत, जि. अहमदनगर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारी रोखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली



हद्दीत सतर्क पेट्रोलिंग मोहीम हाती घेतली आहे. भिगवण पोलिसांचे पथक हद्दीत गस्त घालीत असताना गुरुवारी (ता. १६) रात्री साडेसात वाजता अकोले गाव परिसरात एक संशयित इसम मोटारसायकलवर फिरताना आढळला.

त्याची झडती घेतली असता त्याने त्याचे नाव गणेश टिंगरे असे सांगितले. त्याच्याकडील दुचाकीविषयी माहिती घेतली असता दुचाकी हि चोरीचे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता मदनवाडी पुलाजवळून पॅजो कंपनीची रिक्षाचोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ६० हजार रुपयांची मोटारसायकल व ४० हजार रुपयांची रिक्षा जप्त केली. तपासादरम्यान आरोपीकडील मोटारसायकल ही मिरजगाव (अहमदनगर) येथून चोरीस गेल्याचेही निष्पन्न झाले. याप्रकरणी मिरजगाव पोलीस स्टेशन जि. अहिल्यानगर येथे गुन्हा नोंद असल्याचे आढळले.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे, भिगवण पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार महेश उगले, सचिन पवार, संतोष मखरे, शहाजी सुद्रिक यांच्या पथकाने केली आहे. गुन्हयांचा पुढील तपास पोलीस अंमलदार महेश उगले हे करीत आहेत. भिगवण पोलिसांच्या या तत्पर कारवाईबद्दल स्थानिक नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## अफगाणिस्तानमधील रहिवासी भागात पाकिस्तानकडून हवाई हल्ला

### आठ क्रिकेटपटूंचा मृत्यू; काही जण जखमी

**मुंबई, ता. १८ :** पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. युद्धबंदीनंतरही पाकिस्तानकडून अफगाणिस्तानवर हवाई हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात अफगाणिस्तानमधील पक्तिका प्रांतातील आठ क्लब स्तरावरील क्रिकेटपटूंचा मृत्यू झाला असून, काही जण गंभीर जखमी झाले आहेत.

स्थानिक वृत्तसंस्था टोलो न्यूजच्या माहितीनुसार,उर्गुन जिल्ह्यात झालेल्या या हवाई हल्ल्यात खेळाडू सामन्यानंतर घराकडे परतत असताना निशाणा बनले. पाकिस्तानच्या हवाई दलाने टाकलेल्या बॉम्बमुळे या निष्पाप खेळाडूंना आपला जीव गमवावा लागला. हा हल्ला युद्धबंदीच्या अटींचे उल्लंघन असल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला



आहे. तसेच मृत क्रिकेटपटूंना श्रद्धांजली अर्पण केली आहे. एक्स (पूर्वीचे ट्विटर) वरून बोर्डाने म्हटले, पाकिस्तानी हवाई दलाच्या भ्याड हल्ल्यात आमच्या पक्तिका प्रांतातील क्रिकेटपटूंचा बळी गेला, याचे आम्हाला अतोनात दुःख आहे. या पार्श्वभूमीवर अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने नोव्हेंबर अखेरीस होणाऱ्या त्रिकोणीय टी-२० मालिकेतून माघार घेतली आहे. ही मालिका पाकिस्तानविरुद्ध खेळवली जाणार होती.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी दोन्ही देशांतील वाढत्या तणावाबाबत चिंता व्यक्त केली आहे. पाकिस्तानच्या कारवाईनंतर अफगाणिस्तानकडून कोणती प्रतिक्रिया येणार, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे. या घटनेने संपूर्ण अफगाणिस्तानात शोककळा पसरली आहे.

## पुण्यातील जैन बोर्डिंगची जागेच्या व्यवहारामध्ये मुरलीधर मोहोळांचा संबंध नाही

**पुणे, ता. १८ :** पुण्यातील जैन समाजाच्या ट्रस्टच्या मालकीच्या जमिनीवरून निर्माण झालेल्या वादात आता राजकीय रंग भरू लागला आहे. या प्रकरणात माजी खासदार राजू शेट्टी यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मात्र, एबीपी माझाच्या रिॲलिटी चेकनुसार, या जागेच्या विकासाशी सध्या मुरलीधर मोहोळ यांचा कोणताही व्यवसायिक संबंध नसल्याचे कागदपत्रांमधून स्पष्ट झाले आहे.

जैन समाजाने केलेल्या आरोपांनुसार, पुण्यातील मॉडेल कॉलनी परिसरातील जैन बोर्डिंग हाऊसची जागा विश्वस्तांनी बेकायदेशीरपणे विकली आहे. या जागेचा गैरवापर करून जमीन हडपल्याचा आरोप समाजाने केला आहे. त्यांनी या प्रकरणी आंदोलनही केलं असून, केंद्रीय राज्यमंत्री म ुरलीधर मोहोळ आणि दोन बिल्डरांनी संगनमताने ही जमीन हडप केल्याचा दावा केला. याच पार्श्वभूमीवर राजू शेट्टी यांनी सार्वजनिक सभेत मोहोळ यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करत कठोर वक्तव्य केले.

तथापि, या प्रकरणातील कागदपत्रांचा तपास घेतल्यानंतर समोर आलेल्या माहितीनुसार, जैन समाजाची ही जागा बांधकाम व्यावसायिक विशाल गोखले यांना २०२५ मध्ये विकासासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मोहोळ आणि गोखले हे २०२१ पासून व्यवसायिक भागीदार होते,



मात्र फेब्रुवारी २०२५ मध्ये मुरलीधर मोहोळ यांनी त्या भागीदारीतून अधिकृतपणे माघार घेतली होती. त्यामुळे सध्या त्यांच्या आणि गोखले यांच्या मध्ये कोणतेही व्यावसायिक नाते अस्तित्वात नाही, असे नोंदींवरून दिसून येते.

जैन बोर्डिंग हॉस्टेलचा हा वाद नवीन नाही. पुण्यातील शिवाजीनगर भागात असलेल्या या जागेवर दिगंबर जैन बोर्डिंग आणि श्वेतांबर जैन बोर्डिंग अशी दोन स्वतंत्र वसतिगृहे आहेत. १९५८ साली हिराचंद नेमचंद दोषी यांनी या वसतिगृहाची उभारणी केली होती. काही महिन्यांपूर्वी विश्वस्तांनी या जागेचा नवीन विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला, मात्र समाजातील काही सदस्यांनी त्याला विरोध केला. विरोधकांच्या मते, ही जागा जैन समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी राखीव ठेवण्यात आली होती आणि तिचा व्यावसायिक उपयोग करणे हे विश्वासघाताचे कृत्य आहे.

दरम्यान, जैन समाजाच्या सदस्यांचा आरोप आहे की, या जागेची विक्री धर्मादाय आयुक्तांच्या मंजुरीने झाली असली तरी नियम आणि कायद्यांची पायमल्ली करण्यात आली आहे. विक्रीचा व्यवहार गोखले कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत करण्यात आला असून, त्यामुळे या व्यवहाराची चौकशी व्हावी, अशी मागणी समाजाकडून करण्यात आली आहे. या वादामुळे पुण्यातील धार्मिक आणि राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकीकडे जैन समाज न्याय आणि पारदर्शकतेची मागणी करत आहे, तर दुसरीकडे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी स्वतः चा या व्यवहाराशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिस आणि धर्मादाय विभाग या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# वळतीत शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींची व केबलची चोरी

## शेतकऱ्यांचे मोठे नुकसान, चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**उरुळी कांचन, ता. १८ :** एकीकडे अतिवृष्टी, पूर आणि निसर्गाच्या संकटाने शेतकऱ्यांचे जगणे आधीच कठीण झालेले असताना आता चोरीच्या घटनांनी त्यांच्या अडचणीत आणखी भर टाकली आहे. वळती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील सुमारे १० ते १२ शेतकऱ्यांच्या विहीरीवरील विद्युत मोटारी व बोअरवेलच्या केबल्स अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याच्या घटना आज बुधवारी (ता. १५) सकाळी उघडकीस आल्या आहेत. या घटनेत वळती ग्रामपंचायतीद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या मोटरचाही समावेश आहे. या घटनेने परिसरातील शेतकरी वर्गात संतापाचे वातावरण आहे.




या घटनेत जवळपास दीड ते दोन लाखांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. ही चोरी रात्रीच्या वेळी झाली असावी असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आधीच पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे. पिके वाहून गेली, माती साचली, सिंचन व्यवस्था विस्कळीत झाली आहे. अशा परिस्थितीत विहरीवरील विद्युत मोटारी व बोअरवेलच्या केबल्स चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे सिंचन पुन्हा ठप्प झाले असून या घटनेमुळे त्यांच्या हालअपेष्टांत अधिक भर पडली आहे. वाढत्या केबल चोरीमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत.

या परिसरातील माणिक कोलते, केतन कुंजीर, बाळासाहेब कोद्रे, प्रकाश पिसाळ, रामदास कुंजीर, व वळती ग्रामपंचायत कार्यालयाची पाणीपुरवठा करणारी मोटार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना मंगळवारी रात्री उघडकीस आली आहेत.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या विद्युत केबल, मोटर चोरीच्या घटना घडत असून यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. उरुळी कांचन पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी तसेच शेतकरी किरण कुंजीर व पोलीस पाटील मोहन कुंजीर यांनी केली आहे.

# नसरापूर ग्रामपंचायत आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची लकी ड्रॉने सोडत

**विशाल शिंदे**

नसरापूर, ता. १८ : नसरापूर ग्रामपंचायतच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अभियानांतर्गत आयोजित केलेला लकी ड्रॉ सोडत कार्यक्रम ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. बुधवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता झालेल्या या कार्यक्रमात कर भरणाऱ्या नागरिकांचा उत्स्फुर्त सहभाग दिसून आला. या उपक्रमाचा उद्देश गावातील कर वसुली वाढवून ग्रामपंचायतीच्या विकासकामांना गती देणे हा होता.

या उपक्रमामुळे केवळ एका महिन्यात तब्बल १२ लाख रुपयांचा ग्राम पंचायत कर जमा झाला. कर भरणाऱ्या जवळपास ४९७ मिळकतदारांनी यात



सहभाग घेतला होता. लकी ड्रॉमध्ये प्रथम बक्षीस एलईडी टीव्ही वैशाली चंद्रकांत भोसले, द्वितीय बक्षीस फ्रिज चांगदेव दादाभाऊ गाजरे, तृतीय बक्षीस कुलर सुवर्णा चंद्रशेखर जोशी, चौथे बक्षीस मिक्सर अमोदिनी महेश दळवी आणि पाचवे बक्षीस इस्त्री रमेश कृष्णा ताटले यांना मिळाले.

लकी ड्रॉ सोडतीसाठी मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते करदात्यांची नावे निवडण्यात आली. विशेष म्हणजे, लकी ड्रॉमध्ये सहभाग घेणाऱ्या सर्व करदात्यांना नसरापूर ग्राम पंचायतीतर्फेएक ओल्या कचऱ्यासाठी व एक सुख्या कचऱ्यासाठी डस्टबिन देण्यात आले, ज्यामुळे दैनंदिन स्वच्छतेचा संदेशही या कार्यक्रमातून देण्यात आला.

दरम्यान, कार्यक्रमास विस्तार अधिकारी बबन चखाले, सरपंच उषा विक्रम कदम, उपसरपंच इरफान हबीब मुलानी, माजी सरपंच सपना ज्ञानेश्वर झोरे, माजी उपसरपंच संदीप शंकरराव कदम, ग्रामपंचायत सदस्य नामदेव आत्माराम चव्हाण, गणेश सुरेश दळवी, सुधीर सोपान वाल्हेकर, ॲड. मेघा उमेश लष्कर, ग्रामसेवक रुपेश हरपुडे, रमेश शंकरराव कदम, सुधीर शेडगे आणि नारी आदिशक्ती समूहाच्या अध्यक्षा जयश्री संजय वाल्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

> नसरापूर ग्रामपंचायतीचा उद्देश नागरिकांचा या उपक्रमात सहभाग वाढवून गाव विकासासाठी निधी उभारणे हा आहे. पुढेही अशाच उपक्रमांद्वारे ग्रामस्थांना अधिक चांगल्या सुविधा देऊन नसरापूर गाव समृद्ध गाव बनविण्याचा आमचा प्रयत्न राहील.
> - **उषा कदम,** सरपंच, नसरापूर, ता. भोर

# वर्गातच शिक्षकाकडून विद्यार्थिनीसोबत अश्लील कृत्य?

**पुणे, ता. १८ :** पिंपरी-चिंचवडमधून एक संतापजनक घटना उघडकीस आली आहे. येथील महापालिकेच्या शाळेत इयत्ता चौथीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीसोबत वर्गशिक्षकाने अश्लील वर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपी शिक्षकाला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मनोज प्रभाकर धाईंजे (वय ५१) असे आरोपीचे नाव असून, तो वाल्हेकरवाडी येथील महापालिकेच्या शाळेत कार्यरत होता. घटनेच्या दिवशी संबंधित विद्यार्थिनी वर्गात उपस्थित होती. यावेळी शिक्षकाने तिच्या जवळ जाऊन अत्यंत गैरवर्तन केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे, वर्गात इतर विद्यार्थी उपस्थित असतानाही शिक्षकाने ही अमानवी कृत्य केल्याचे समजते.

घटनेनंतर घाबरलेली विद्यार्थिनी शाळा सुटताच थेट घरी पोहोचली व सर्व प्रकार पालकांना सांगितला. ही माहिती मिळताच संतप्त वडिलांनी चिंचवड पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि आरोपीविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत धाईंजे याला अटक केली असून न्यायालयाने त्याला २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. चिंचवड पोलीस प्रकरणाचा तपास करत असून, मुलीचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. या प्रकारामुळे परिसरात तीव्र संतापाचे वातावरण पसरले आहे. पालक वर्गात मोठ्या प्रमाणावर अस्वस्थता असून, शाळेतील सुरक्षाव्यवस्थेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# अग्निशमन दलाची सुरक्षित दिवाळी मोहीम

**पिंपरी, ता. १८ :** फटाक्यांमुळे दिवाळीच्या कालावधीत घडणाऱ्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत सुरक्षित दिवाळी मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत आपत्कालीन परिस्थितीसाठी पूर्वतयारी तसेच विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

दिवाळी काळात शहरात आगीच्या घटनांची शक्यता लक्षात घेऊन अग्निशमन विभाग सज्ज झाला आहे. महापालिकेच्या सर्व दहा अग्निशमन केंद्रांना सतर्क राहण्याचे, तसेच सर्व कर्मचारी आणि अधिकारी रजा रद्द करून चोवीस तास कार्यरत राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्य नियंत्रण कक्ष चोवीस तास कार्यरत राहणार आहे. १०१ क्रमांकावर संपर्क केल्यास तातडीने प्रतिसाद देण्यात येत आहे. फटाक्यांच्या स्टॉल परिसरात अग्निशमन वाहनांची गस्त ठेवण्यात



आली आहे. फटाकेविक्रेत्यांना आणि नागरिकांना लेखी आणि मौखिक सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी वाहनतळ, रस्ते, वसाहती आणि बाजारपेठांमध्ये निष्काळजीपणे फटाके फोडणे टाळावे. फटाके फोडताना किमान दोन मीटरचे अंतर राखावे. फटाक्यांचा साठा घरात, वाहनात किंवा बंद जागेत ठेवू नये. स्वतःची, कुटुंबाची आणि समाजाची सुरक्षा राखावी. आग लागल्यास त्वरित या अग्निशमन नियंत्रण कक्षाच्या क्रमांकावर संपर्क साधावा. अग्निशमन दलातील सर्व पथकांना अतिरिक्त सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. प्रत्येक अग्निशमन केंद्रात आपत्कालीन वाहने सज्ज ठेवली असल्याचे उप अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांनी सांगितले.

दरम्यान, शहर जलद गतीने विकसित होत असून, लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे अग्निसुरक्षेचा विषय प्रत्येकाच्या दैनंदिन आयुष्याशी जोडलेला आहे. सुरक्षित दिवाळी ही केवळ मोहीम नसून नागरिकांमध्ये जबाबदार वर्तणुकीची सवय निर्माण करण्याचे पाऊल असल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी सांगितले.

# पुण्यात भटक्या श्वानावर अनैसर्गिक अत्याचार; ५५ वर्षीय व्यक्तीवर गुन्हा

**पुणे, ता. १८ :** एका इसमाने आपल्या विकृतीने सांस्कृतिक नगरी असलेल्या पुण्याची मान शरमेने खाली घातली आहे. अंगात पशू संचारल्याप्रमाणे या इसमाने रस्त्यावरच्या एका भटक्या कुत्र्याला आपल्या घरात नेऊन त्याच्यावर अनैसर्गीक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. ही घटना पुण्यातील वडारवाडी परिसरात घडली असून या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. चतुःश्रृंगी पोलिसांनी नराधमाला अटक केली आहे.

यात्रकरणी एका ५५ वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. प्राणीमित्र संजय रामचंद्र शिंदे (वय-५९, मॉडेल कॉलनी,




शिवाजीनगर पुणे) यांनी चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजय शिंदे व त्यांच्या ग्रुपमधील सदस्य मॉडेल कॉलनी भागातील सर्व अनीमलचे खाण्याचे व त्यांच्यावर औषधउपचार करण्याचे काम करीत आहेत. परंतु, त्यांना मॉडेल कॉलनी परिसरातील एक डॉग मागील काही दिवसापासुन मिळुन येत नव्हता.

दरम्यान, डॉगची अधिक चौकशी केली असता, एका व्यक्तीने डॉगसोबत अनैसर्गिक संभोग केला आहे. तेंव्हा पासुन सदरचा डॉग हा बाहेर आला नसुन तो आजारी आहे. अशी माहिती मिळाली. तसेच तेथील एका इसमाने एक व्हिडीओ पाठविला आहे. त्यामध्ये एक इसम या डॉग सोबत अनैसर्गीक संभोग करत असल्याचे दिसुन आले आहे.

दरम्यान, डॉग सोबत अनैसर्गीक संभोग करून त्याचे स्वास्थ बिघडवुन छळ केला आहे. प्राण्यास वेदना व यातना होतील असे कृत्य केले आहे. अशी तक्रार शिंदे यांनी चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात दिली आहे. गुन्हा दाखल होताच चतुःश्रृंगी पोलिसांनी तत्काळ आरोपीला अटक केली आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## तुम्ही कधी लेमनग्रास टी घेतला आहे का? फायदे जाणून घ्या

पुणे, ता. १८ : चहाचे अनेक प्रकार तुम्हाला माहित असतील. शतकानुशतकेऔषधी वनस्पती आणि हर्बल टी वापरल्या जात आहेत. पण तुम्ही कधी लेमनग्रास टी घेतला आहे का? लेमनग्रास टी म्हणजेच गवती चहा. लेमनग्रास चहा पचन, तणाव, चिंता, संक्रमण, वेदना, हृदयरोग आणि इतर अनेक आजारांवर मदत करू शकतो. ग्रीन टी, ब्लॅक टी हे आरोग्यासाठी फायदेशीर आहे, हे तर तुम्ही ऐकले असेलच. असेच लेमनग्रास टी सुद्धा तुमच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे.

असा बनवा लेमनग्रास टी : लेमनग्रास टी बनवण्यासाठी ४ कप पाणी, १ कप लेमनग्रास, १ टेबलस्पून मध घ्या. लेमनग्रास पाण्याने धुवा आणि नंतर साफ केल्यानंतर त्यांचे लहान तुकडे करा आणि ग्राइंडिंग स्टोनच्या मदतीने बारीक करा. गॅसवर पॅन ठेवा, त्यात पाणी घाला आणि उकळू द्या. पाण्यात लेमनग्रासचे छोटे तुकडे घाला आणि १० मिनिटे उकळू द्या. शेवटी त्यात मध टाकून प्या.

हे आहेत लेमनग्रास टीचे फायदे : अँटिऑक्सिडंट्स लेमनग्रास टी हा एक प्रकारचा डिटॉक्स चहा आहे. त्यात अनेक अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीराला आतून डिटॉक्सिफाय आणि साफ करण्यास मदत करतात. हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते.

हेअर ग्रोथ केसांच्या वाढीसाठी लेमनग्रास ही एक प्रभावी पद्धत आहे, जी केसांचे पोर्स उघडण्यास आणि केसांच्या वाढीस प्रोत्साहन देते. त्यात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन ए आणि सी असतात, जे त्वचा आणि केस दोघांसाठी आवश्यक पोषक घटक म्हणून काम करतात.

ओरल हेल्थ अभ्यासानुसार लेमनग्रासमधील अँटीमायक्रोबियल गुण स्ट्रेप्टोकोकस सॅन्गुनिस बॅक्टेरियाशी लढण्यास मदत करतात, हे बॅक्टेरिया दात किडण्यासाठी जबाबदार असतात. लेमनग्रासमुळे तुमची ओरल हेल्थ म्हणजे तोंडाचे आरोग्य देखील सुधारते.

उच्च रक्तदाब नियंत्रित लेमनग्रासमध्ये पोटॅशियम असते, त्यामुळे यूरिन वाढण्यास मदत होते. त्यामुळे ते रक्तदाब कमी करते आणि रक्त प्रवाह वाढवते.

वजन कमी करा लेमनग्रास टी चा वापर डिटॉक्स टीच्या रुपाने मेटाबॉलिज्म वाढवण्यासाठी केला जातो. तो वजन कमी करण्यास देखील मदत करतो.

पचनासाठी- लेमनग्रास पचनासाठी खूप चांगले आहे, जे तुमचे पोट शांत करण्यास मदत करते आणि तुमचे पचन नियंत्रित ठेवते. यामध्ये सायट्रल नावाचे तत्व असते जे अन्न पचण्यास मदत करते.

# कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रातील भिंत कोसळून दोन महिला मजुरांचा मृत्यू, एक जखमी

## गुन्हा दाखल करण्यात ८ तासांचा विलंब

**पुणे, ता. १८ :** दौंड तालुक्यातील कुरकुंभ एमआयडीसी परिसरातील मेलझर केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत गुरुवारी (ता. १६) दुपारी झालेल्या भीषण दुर्घटनेत दोन महिला कामगारांचा मृत्यू झाला असून एक महिला गंभीर जखमी झाली आहे. भिंत बांधकामादरम्यान निष्काळजीपणाने काम केल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आले आहे. या गंभीर घटनेनंतर जवळपास ८ तासांनी एफआयआर दाखल करण्यात आला, त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



मृत महिलांची नावे ममतादेवी सुदामा दास (वय २७, रा. पांढरेवाडी, दौंड, मूळ रा. बिहार) आणि सोनीदेवी सरयु कुमार (वय २८, रा. पांढरेवाडी, दौंड, मूळ रा. बिहार) अशी आहेत. तर जखमी महिला गीतादेवी बाबूलाल कोल (रा. पांढरेवाडी, मूळ रा. मध्य प्रदेश) अशी आहे.

ही घटना १६ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी सुमारे साडेचार वाजता घडली. कुरकुंभ एमआयडीसीतील मेलझर केमिकल प्रा. लि. या कंपनीच्या परिसरात सुरक्षा भिंतीचे बांधकाम सुरू होते. त्या दरम्यान, भिंतीच्या बाहेरच्या बाजूने जेसीबीद्वारे मातीची भर टाकण्याचे काम सुरू असताना ओल्या भिंतीवर अतिरिक्त दबाव आला आणि भिंत अचानक कोसळली. भिंतीखाली तीन महिला कामगार अडकल्या. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढण्यात आले आणि दौंड येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, दोन महिलांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

या प्रकरणी पोलीस हवालदार संजय धनीराम नगरे यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी कॉन्ट्रॅक्टर जयकुमार रामचंद्र मुंडफणे (वय ४६, रा. मांजरी ग्रीन्स, पुणे) आणि सुपरवायझर अक्षय भानुदास मोरे (वय २८, रा. मांडवगण फराटा, ता. शिरूर) यांच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम १०५, १२५, १२५(a), १२५(b) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, तपासात असे समोर आले की, दोन्ही आरोपींनी भिंतीचे बांधकाम ओले असतानाही बाहेरील बाजूने मातीची भर टाकण्याचे काम सुरू ठेवले. यामुळे भिंतीवर मातीचा दबाव वाढून ती कोसळली. या निष्काळजीपणामुळे दोन महिलांचा मृत्यू झाला. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बिद्री करत आहेत.

## लोणी स्टेशन स्थानकात एक्सप्रेसनच्या धडकेत ट्रक चालकाला मृत्यू

लोणी काळभोर, ता. १८ : पुणे दौंड लोहमार्गावरून भरधाव वेगाने चाललेल्या उद्यान एक्सप्रेसने एका ट्रकचालकला धडक दिल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी रेल्वे स्थानकात शनिवारी (ता.१८) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे.

मनोज कांबळे असे मृत्यू झालेल्या ट्रकचालकाचे नाव असल्याची माहिती मिळत आहे. मनोज हा लोणी काळभोर येथील मालधक्क्यात ट्रकचालक म्हणून काम करीत होता. दरम्यान, मनोज हा दुपारच्या सुमारास रेल्वे लाईन क्रॉस करीत होता. तेव्हा त्याच्या कानात हेडफोन होता. त्यामुळे त्याला गाडीचा आवाज आला नाही. दरम्यान, सोलापूरकडून पुण्याच्या दिशेने चाललेल्या उद्यान एक्सप्रेसने त्याला जोरदार धडक दिली. या अपघातात मनोज याचा जागेवरच चेंदामेंदा होऊन मृत्यू झाला.

# घायवळच्या नावाने सोशल मीडियावर नीलेश करत होता आपल्या गुन्हेगारीचे उदात्तीकरण

## निलेश घायवळवर आणखी एक गुन्हा दाखल

**पुणे, ता. १८ :** कुख्यात गुंड नीलेश घायवळ याने स्वतःचे नाव बदलून पासपोर्ट मिळवण्यासाठी फसवणुकीचा प्रयत्न केल्याचं आणि त्याचबरोबर सोशल मीडियावर आपल्या गुन्हेगारी कृत्याचं उदात्तीकरण केल्याचं धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. या प्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या गुन्ह्यात नीलेश घायवळसह काही इंस्टाग्राम अकाउंट धारकांचाही समावेश असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निलेश घायवळ हा पुण्यातील कुख्यात गुंड असून त्याच्यावर विविध गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. पासपोर्ट मिळवण्यासाठी त्याने स्वतःचं नाव बदलून निलेश गायवळ असं नाव वापरलं. याच नावाने त्याने सोशल मीडियावर, विशेषतः इंस्टाग्रामवर चार वेगवेगळी खाते उघडली. या खात्यांवरून त्याने स्वतःचे फोटो, हालचालींचे व्हिडिओ आणि त्याचं गुन्हेगारी आयुष्य गौरवणारे रील्स तयार करून पोस्ट केले. या रील्समध्ये गुन्हेगारी वृत्तीचं उदात्तीकरण करणारे ऑडिओ आणि संदेश होते. त्यामुळे समाजात त्याची दहशत निर्माण झाली असल्याचं पोलिसांच्या तक्रारीत म्हटलं आहे.

या प्रकरणात पोलिस अंमलदार प्रशांत साखरे यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार कोथरूड पोलिसांनी नीलेश घायवळ तसेच संबंधित इंस्टाग्राम खातेधारकांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक अंगत नेमाणे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

प्राथमिक तपासात हे समोर आलं आहे की आरोपीने सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वतःच्या गुन्हेगारी प्रतिमेला ब्रँड स्वरूप देण्याचा प्रयत्न केला होता. समाजात भीती निर्माण करणं आणि स्वतःला प्रभावशाली गुंड म्हणून दाखवणं, हा त्यामागचा मुख्य उद्देश असल्याचं पोलिसांनी सांगितलं. काही रील्समध्ये त्याच्या नावाने गँगस्टर टॅग, गुन्हेगारी गाणी आणि हिंसक दृश्यांचाही वापर करण्यात आला होता.

पोलिसांच्या मते, नीलेश घायवळ याने पासपोर्ट प्रक्रियेदरम्यान आपल्या नावातील फक्त एक अक्षर बदलून प्रशासनाला भ्रमित करण्याचा प्रयत्न केला होता. घायवळ ऐवजी गायवळ असं नाव वापरल्यामुळे तो प्राथमिक छाननीतून सुटला होता. मात्र, सोशल मीडियावरून त्याची ओळख उघड झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. दरम्यान, या घटनेमुळे पुन्हा एकदा प्रश्न निर्माण झाला आहे की, कुख्यात गुन्हेगार सोशल मीडियाचा वापर करून आपल्या प्रतिमेचं उदात्तीकरण करत आहेत आणि प्रशासनाला फसवण्याचा प्रयत्न करत आहेत. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केलं आहे की अशा प्रकारचे खाते किंवा रील्स दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, जेणेकरून अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवता येईल.




# पुढील वर्षापासून चौथी, सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा

**मुंबई, ता. १८ :** शासनाने शिष्यवृत्ती परीक्षांच्या स्तरात मोठा बदल करण्यास औपचारिक मान्यता दिली आहे. आतापर्यंत इयत्ता पाचवी आणि इयत्ता आठवीमध्ये घेण्यात येत असलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, पुढील शैक्षणिक सत्र २०२५२६ पासून इयत्ता चौथी आणि इयत्ता सातवी या स्तरावर आयोजित केल्या जाणार आहेत.

या नवीन बदलानुसार, फेब्रुवारी २०२६ च्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या रविवारी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा होण्याची शक्यता आहे, तर इयत्ता चौथी व सातवीची परीक्षा एप्रिल किंवा मे २०२६ अखेरच्या रविवारी होईल. २०२६२७ च्या शैक्षणिक सत्रापासून या परीक्षांचे नवीन स्तर कायम राहणार आहेत.

शिष्यवृत्ती रक्कम देखील पुनर्रचित करण्यात आली आहे: इयत्ता चौथीसाठी वार्षिक ५,००० रुपये, तर इयत्ता सातवीसाठी ७,५०० रुपये मंजूर करण्यात आले आहेत. संचांच्या बाबतीत, चौथी व पाचवीसाठी प्रत्येकासाठी १६,६९३ संच आणि सातवी व आठवीसाठी १६,५८८ संच राखण्यात आले आहेत. याशिवाय ही परीक्षा आता प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. चौथी स्तर) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. सातवी स्तर) ह्या नावांनी ओळखली जाईल.

ही योजना १९५४५५ पासून चालू असून, तिचा मुख्य हेतू गरीब, हुशार आणि प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देणे हा राहिला आहे. २०१५ च्या शासन निर्णयानुसार, तेव्हा ही परीक्षा इयत्ता पाचवी आणि आठवी स्तरावर स्थानांतरित करण्यात आली होती. परंतु त्या नंतर प्रविष्ट विद्यार्थ्यांची संख्या घटल्याचे निदर्शनास आल्यावर, सरकारने हा विषय पुन्हा विचारात घेतला. शासनमान्य शाळांमधील विद्यार्थी शासकीय, अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित हे परीक्षा देण्यास पात्र ठरतील. CBSE, ICSE व इतर अभ्यासक्रम राबवणाऱ्या शाळेतील विद्यार्थीही विशिष्ट अटींच्या अधीन राहून सहभागी होऊ शकतील.

दरम्यान, वयोमर्यादेनुसार, प्राथमिक (इयत्ता चौथी) परीक्षेसाठी सामान्य विद्यार्थ्यांची कमाल वय १० वर्षे, दिव्यांगांसाठी १४ वर्षे ठेवण्यात आली आहे. उच्च प्राथमिक (इयत्ता सातवी) परीक्षेसाठी सामान्य विद्यार्थ्यांची कमाल वय १३ वर्षे, तर दिव्यांगांसाठी १७ वर्षे राहणार आहे. परीक्षा शुल्क व्यवस्था देखील सुधारण्यात आली आहे: सामान्य विद्यार्थ्यांसाठी प्रवेश व परीक्षा शुल्क एकत्र २०० रुपये, तर अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती व दिव्यांगांसाठी १२५ रुपये ठेवण्यात आले आहे. तसेच, प्रत्येक सहभागी शाळेला २०० रुपये नोंदणी शुल्क परीक्षा परिषदेकडे जमा करावे लागेल.

# अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर महसूल प्रशासनाचा दणका

## सहा बोटी जिलेटिनने उडवल्या

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. १८ : उजनी धरण परिसरात अवैध वाळू उपसा करणाऱ्या माफियांविरुद्ध महसूल प्रशासनाने पुन्हा एकदा धडाकेबाज कारवाई करत सहा फायबर बोटी जिलेटिनच्या साहाय्याने उध्वस्त केल्या. ही कारवाई शुक्रवारी (ता. १७) तालुक्याच्या माळवाडी व शहा गावांच्या हद्दीत करण्यात आली. महसूल प्रशासनाच्या या निर्भीड पावलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून उजनीच्या पात्रात वाळू माफियांचा सुळसुळाट सुरू असून, शासनाच्या मनाईनंतरही धरणातून वाळू उपसा करण्याचे प्रकार वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी आणि बारामतीचे उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार जीवन



बनसोडे यांच्या नेतृत्वात महसूल पथकाने ही कारवाई केली. या पथकात मंडळ अधिकारी औदुंबर शिंदे, अशोक पोळ, वैभव मुळे, महसूल सेवक दत्तात्रेय पोळ, तसेच पोलिस पाटील सुनील राऊत आणि अरुण कांबळे यांनी सहभाग घेतला. दरम्यान, गेल्या सहा महिन्यांपासून महसूल आणि पोलिस प्रशासनाकडून अवैध वाळू उपशावर सातत्याने कारवाई केली जात असून, शेकडो बोटी जप्त किंवा नष्ट करण्यात आल्या आहेत. तरीही वारंवार नवीन बोटी नदीपात्रात अवैधरित्या येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या वाळूमाफियांना राजकीय किंवा प्रशासकीय पातळीवर कोणाचा आशिर्वाद आहे का? असा सवाल नागरिकांमधून जोरात उपस्थित केला जात आहे. महसूल विभागाच्या या धाडसी कारवाईनंतर उजनी परिसरातील अवैध वाळू उपशांवर काही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पुणे शहरातील १७ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

**पुणे, ता. १८ :** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील पोलिस यंत्रणेमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. पुणे शहरातील १७ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी जारी केले आहेत. या बदल्यांमुळे शहरातील अनेक पोलीस ठाण्यांमध्ये नवीन नेतृत्व कार्यभार स्वीकारणार आहे.

पोलिस निरीक्षकांचे नाव (सध्याचे ठिकाण) आणि नवीन नेमणुकीचे ठिकाण : कांचन जाधव (पोलिस निरीक्षक विश्रांतवाडी पोलिस ठाणे), पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, रवींद्र शेळके (पोलिस निरीक्षक, येरवडा पोलिस ठाणे): पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा माया देवरे (पोलिस निरीक्षक, मुंढवा पोलिस ठाणे): गुन्हे शाखा सुनील पंधरकर (नियंत्रण कक्ष):




पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा विजय टिकोळे (पोलिस निरीक्षक, विशेष शाखा): पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, अजय संकेश्वरी (नियंत्रण कक्ष): पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, संतोष सोनवणे (नियंत्रण कक्ष): पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, संदीपान पवार (पोलिस निरीक्षक, विशेष शाखा): पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, अरुण हजारे (नियंत्रण कक्ष): पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुरुदत्त मोरे (पोलिस निरीक्षक, नांदेड सिटी पोलिस ठाणे): पोलिस निरीक्षक, विशेष शाखा, दत्ताराम बागवे (पोलिस निरीक्षक, विश्रांतवाडी पोलिस ठाणे): पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, अंजुम बागवान (पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा): पोलिस निरीक्षक, येरवडा पोलिस ठाणे, मंगेश हांडे: पोलिस निरीक्षक, विश्रांतवाडी पोलिस ठाणे स्मिता वासनिक (पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा) : पोलिस निरीक्षक, मुंढवा पोलिस ठाणे, भाऊसाहेब पाटील (पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा): पोलिस निरीक्षक, वानवडी पोलिस ठाणे, कुमार घाडगे (पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा): पोलिस निरीक्षक, कोंढवा पोलिस ठाणे, प्रदीप कसबे (पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा): पोलिस निरीक्षक, विश्रामबाग पोलिस ठाणे, या बदल्यांमुळे शहरातील पोलिस यंत्रणेमध्ये नवीन समतोल आणि कार्यक्षमतेचा वेग वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत चाकूने वार करत केली मारहाण

## पिंपरी पोलीस ठाण्यात जावयावर गुन्हा दाखल

**पुणे, ता. १८ :** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिला मारहाण करून गंभीर जखमी करण्याची धक्कादायक घटना चिंचवड परिसरात घडली आहे. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या सासू आणि मेहुण्यावरही आरोपी जावयाने चाकूने वार करत त्यांनाही गंभीर जखमी केले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. पिंपरी पोलीस ठाण्यात पीडित महिलेच्या आईने फिर्याद दिली आहे. या फिर्यादीनुसार, पोलिसांनी २४ वर्षीय जावयाला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिच्यावर वारंवार दमदाटी आणि अत्याचार केले. या वादाचा कळस गाठत त्याने संतापाच्या भरात चाकू उचलला आणि पत्नीच्या गळ्यावर वार केले. तिला वाचवण्यासाठी आई आणि भाऊ घरात आले असता आरोपीने




त्यांच्यावरदेखील चाकूने हल्ला केला. या दोघांनाही गंभीर जखमा झाल्या असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.हे भांडण सुरू असताना परिसरातील रहिवाशांनी आरडाओरडा ऐकून घटनास्थळी धाव घेतली. मात्र, आरोपीने मी या एरियाचा भाई आहे, कोणी मध्ये आले तर त्याला ठार मारीन अशी धमकी देत सर्वत्र दहशत निर्माण केली. काही वेळाने शेजाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिली आणि पिंपरी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचत आरोपीला ताब्यात घेतले.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. चौकशीअंती असे समोर आले की, पती-पत्नीमध्ये गेल्या काही दिवसांपासून सतत वाद सुरू होते. आरोपीचा स्वभाव आक्रमक होता आणि तो वारंवार पत्नीवर संशय घेत असे. पोलिसांकडून आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेला चाकू जप्त करण्यात आला असून, घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, पिंपरी पोलिसांनी सांगितले की, ही घटना घरगुती वादातून उद्भवलेली असली तरी आरोपीच्या धमकीच्या स्वरुपामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी नागरिकांना संयम ठेवण्याचे आवाहन केले असून, पीडित महिला आणि तिच्या नातेवाईकांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# पुणे महानगरपालिका आयुक्तांचा शेवाळवाडी–मांजरी दौरा

## कामचुकार अधिकाऱ्यांवर तडकाफडकी बदलीची कारवाई

**हडपसर, ता. १८ :** पुणे महानगरपालिका आयुक्तांनी शनिवारी (ता. १८) सकाळी शेवाळवाडी व मांजरी परिसराला भेट देऊन पाहणी केली. यावेळी शहरातील स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था, रस्त्यांवरील खड्डे, अतिक्रमण तसेच नाल्यांमधून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी परिसरातील अस्वच्छता, रस्त्यांवरील कचरा आणि अपुरी स्वच्छता व्यवस्था पाहून आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

भेटीदरम्यान संबंधित विभागीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विचारणा करण्यात आली असता त्यांनी



समाधानकारक माहिती न दिल्यामुळे आयुक्तांनी अकार्यक्षम व कामचुकार अधिकारी-कर्मचाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. आयुक्तांनी स्पष्ट केले की, यापुढे निष्काळजीपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खात्यांतर्गत चौकशी, निलंबन तसेच अकार्यकारी पदावर बदलीची कारवाई करण्यात येईल.

याच वेळी, हडपसर क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त श्री. बाळासाहेब ढवळे पाटील यांची तडकाफडकी बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी कार्यकारी अभियंता रवि खंदारे यांच्या नियुक्तीचे आदेश तातडीने देण्यात आले. आयुक्त यांच्या सूचनेनुसार मलनिःसारण विभागाचे शाखा अभियंता, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे आरोग्य निरीक्षक तसेच मुकादम या तिघांवर समाधानकारक काम न केल्यामुळे निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यापूर्वी मागील दोन दिवसांपूर्वी नगर रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वाघोली भागात झालेल्या पाहणीदरम्यानही आयुक्तांनी ड्रेनेज व अतिक्रमण समस्यांबाबत निष्क्रियतेसाठी शितल वाकडे, सहाय्यक आयुक्त, नगर रोड व ड्रेनेज विभागातील उप अभियंता विनायक शिंदे व गणेश पुरम या अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या केल्या होत्या.

पुणेसोलापूर महामार्गावरील दुभाजकांमधील अस्वच्छतेबद्दल देखील आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित विभागांना स्वच्छता सुधारण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश दिले. आयुक्तांनी यावेळी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शहरातील अस्वच्छता, वाहतूक कोंडी, ड्रेनेज आणि अतिक्रमणाच्या समस्या दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे काम करणे आवश्यक आहे; अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल.

महापालिका प्रशासनाच्या या कारवाईमुळे निष्काळजी व कामचुकार अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये कडक संदेश गेला असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने आता सज्जतेचा निर्धार व्यक्त केला आहे.